मराठी
न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२




# ज्येष्ठ नागरिकांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीर उत्साहात संपन्न

## राहुलदादा भोसले यांच्या जन्म दिनानिमित्त 300 हून अधिक नागरिकांची तपासणी

**पिंपरी | प्रतिनीधी**

राहुलदादा भोसले यांच्या जन्मदिनाचे औचित्याने ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याचे संवर्धन या उद्देशाने मोफत आरोग्य तपासणी शिबिर उत्साहात पार पडले. राहुलदादा भोसले युवा मंच, जाणता राजा प्रतिष्ठान आणि आबासाहेब फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने तसेच लोकमान्य हॉस्पिटल, चिंचवड यांच्या सहकार्याने सिद्धेश्वर ज्येष्ठ नागरिक संघटना, मोरेवस्ती, चिखली येथे हे शिबिर पार पडले. यास ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.








नुकत्याच झालेल्या या उपक्रमात ३०० हून अधिक ज्येष्ठ नागरिकांची मोफत तपासणी करण्यात आली. यासाठी आरोग्य तपासणीसाठी उत्साहाने गर्दी केली. या शिबिरात रक्तदाब, मधुमेह, हृदयविकार, ईसीजी, हाडांचे आजार, डोळ्यांची तपासणी, किडनी संबंधित विकार, तसेच जनरल सर्जरीसंबंधी यांसारख्या विविध चाचण्या पूर्णतः मोफत करण्यात आल्या.

तज्ज्ञ डॉक्टरांच्या सल्ल्यामुळे अनेक नागरिकांना त्यांच्या आरोग्याविषयी नव्याने जागरूकता मिळाली. या उपक्रमासाठी अशोक वाळके, कैलास नेवासकर, सुलभाताई उभाळे, नेताजी काशीद, रावसाहेब थोरात, सचिन सानप, दादा नरळे, विनायक रानसूबे, सागर साबळे, पवन मसके आणि अनेक मान्यवर तसेच स्वयंसेवकांनी सक्रिय योगदान दिले.

चिखली परिसरातील नागरिकांनी या उपक्रमाचे कौतुक केले आणि अशा आरोग्यदायी कार्यक्रमांची नियमितपणे आखणी व्हावी, अशी अपेक्षा व्यक्त केली. आरोग्य हेच खरी संपत्ती लक्षात घेऊन हा उपक्रम राबविला गेला. भविष्यातही नागरिकांसाठी विविध सामाजिक आणि आरोग्यविषयक उपक्रम राबविण्याचा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

---

# पुनावळे परिसरातील सर्विस रोडवर डांबरीकरणास सुरुवात

## आमदार शंकरभाऊ जगताप यांच्या पुढाकाराने नागरिकांची दीर्घकाळची मागणी पूर्ण

**पिंपरी | प्रतिनीधी**

आमदार शंकर जगताप यांच्या सूचनेनुसार पुनावळे येथील राष्ट्रीय महामार्गालगतच्या सर्विस रोडवर डांबरीकरणाचे काम सुरू झाले आहे. या कामाच्या प्रारंभी पुनावळे परिसरातील नागरिकांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. अनेक महिन्यांपासून या भागातील रस्त्यांची दुरवस्था झाल्यामुळे नागरिक तक्रारी करत होते.

हा परिसर आयटी क्षेत्रात काम करणाऱ्या तरुणांचा भाग म्हणून प्रचलित आहे.



> “या कामासाठी आमदार शंकर जगताप यांनी सातत्याने पाठपुरावा केला. त्यांच्या पुढाकारामुळेच आज हे काम सुरू झाले आहे. पक्षाच्या वतीने आणि नागरिकांच्या वतीने आम्ही त्यांचे मनःपूर्वक आभार मानतो.
>
> **- नवनाथ ढवळे, सचिव, भारतीय जनता पक्ष, पिंपरी चिंचवड.**

मोठमोठ्या गृहनिर्माण प्रकल्पांमुळे रहिवाशांची वर्दळ या भागात लक्षणीय प्रमाणात वाढली आहे. मुंबई-बेंगळुरू महामार्गालगतचा हा रस्ता दररोज हजारो वाहनांसाठी महत्त्वाचा मार्ग आहे.

मात्र लांबलेल्या पावसामुळे या रस्त्यावर मोठे मोठे खड्डे चिखल जमा व्हायचा. यामुळे वाहतूक संथगतीने चालत होती. आता डांबरीकरणाचे काम सुरू झाल्याने गाड्यांची हालचाल सुरळीत होईल आणि परिसरातील रहिवाशांना मोठा दिलासा मिळेल.

# बिहारचा निर्णय म्हणजे भाजपवरील विश्वास!

## बिहारच्या निकालाचे प्रतिबिंब स्थानिक निवडणुकांच्या निकालात दिसेल - शंकर जगताप

**पिंपरी | प्रतिनिधी**

बिहार निवडणुकीमध्ये येथील नागरिकांनी राज्याचा विकास, स्थिरता आणि मुख्य म्हणजे भाजपच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास व्यक्त केला आहे. या विजयाचे प्रतिबिंब महाराष्ट्रात देखील उमटणार आहे यात कोणतीही शंका नाही असे मत पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप यांनी बिहार निवडणुकीनंतर व्यक्त केले. आजच्या विजयाचे मुख्य कारण सुशासन, लोकांचा प्रचंड विश्वास आणि बिहारमध्ये सुधारलेली कायदा व्यवस्था हेच असू शकते असेही जगताप म्हणाले.



> हा विजय देशभरातील मतदारांमध्ये भारतीय जनता पक्षाबद्दल वाढत असलेल्या विश्वासाचे प्रतीक असून, भविष्यातील अधिक मजबूत आणि सक्षम भारताची पायाभरणी करणारा आहे.या विजयासाठी सातत्याने मेहनत घेणाऱ्या नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच बिहारच्या जनतेचे अभिनंदन करतो. हेच विजयाचे चित्र पिंपरी चिंचवड मध्ये दिसेल.
>
> **- शंकर जगताप, निवडणूक प्रमुख, पिंपरी चिंचवड.**

बिहार राज्याच्या निवडणुकीमध्ये भाजपा प्रणित एनडीए सरकारला "न भूतो न भविष्यती" असा प्रतिसाद मिळाला आहे. या निर्णयाचे स्वागत पिंपरी चिंचवड निवडणूक प्रमुख आमदार शंकर जगताप यांनी केले. याच निर्णयाचे प्रतिबिंब महाराष्ट्रात आणि मुख्यत्वे पिंपरी चिंचवड मध्ये दिसेल असेही निवडणूक निकालानंतर जगताप यांनी म्हटले आहे.

जगताप पुढे म्हणाले बिहार राज्याच्या निवडणुकीत जनतेने विकास, स्थैर्य आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सक्षम नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त करत भाजप-प्रणीत एनडीए आघाडीला स्पष्ट बहुमताने विजयी केले आहे. हा विजय केवळ निवडणुकीचा नाही, तर बिहारच्या जनतेने दिलेला विकासाच्या मार्गावरील ठोस विश्वास आहे. गेल्या काही वर्षांमध्ये बिहारची सुधारलेली कायदा व्यवस्था हा यातील मुख्य मुद्दा आहे.गंगा पथ रिव्हर फ्रंट,पाटणामध्ये मेट्रो यांसारखे महत्त्वाचे उपक्रम राबवले गेले. एनडीए सरकार लोकांच्या कल्याणासाठी आणि राज्याच्या विकासासाठी कटिबद्ध आहे. या उलट महागटबंधनने केवळ आपले नेते आणि कुटुंबाच्या प्रगतीवर लक्ष केंद्रित केल्याने बिहारच्या जनतेने यांना साफ नाकारले आहे.

जगताप पुढे म्हणाले, गेल्या काही वर्षात केंद्र सरकारने राबविलेल्या जनकल्याणकारी योजनांचा आणि सुशासनाचा लाभ राज्यातील प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचला. त्याचेच फलित म्हणजे बिहारच्या मतदारांनी पुन्हा एकदा भाजप प्रणित एनडीए सरकारच्या हातात राज्याची धुरा सोपवण्याचा ऐतिहासिक निर्णय घेतला आहे. पंतप्रधान मोदी यांच्या माध्यमातून हिंसाचार, भ्रष्टाचार आणि अराज्य पासून मुक्तता मिळाली आहे. आता बिहार 3.0 होण्याची वेळ आहे.यातून औद्योगीकरण आणि स्टार्टअप उभे राहतील. गुणवत्तापूर्ण शिक्षण, औद्योगीकरण आधारित प्रणाली, गुंतवणूक आणि राज्यात रोजगाराचे मॉडेल असेल असा विश्वास आहे.

# नियम मोडणाऱ्या 30 आरएमसी प्लांटवर होणार कारवाई

## मोठ्या प्रमाणात वायू प्रदूषण; पिंपरी चिंचवड महापालिकेकडून इशारा

**पिंपरी | प्रतिनीधी**

पिंपरी चिंचवड महापालिका परिसरातील आर.एम.सी. प्लांट यांना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत परवानगी दिली जाते. आर.एम.सी. प्लांटमुळे होणारे वायू प्रदूषण रोखण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत योग्य त्या प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. मात्र काही आर.एम.सी. प्लांट धारकांकडून या उपाययोजनांची अंमलबजावणी होत नसून त्यामुळे वायू प्रदूषण होत असल्याच्या तक्रारी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे प्राप्त होत होत्या.




> पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांचे आरोग्य व पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी प्रत्येक घटकाने नियमांचे पालन करणे अत्यंत आवश्यक आहे. पर्यावरणाच्या अनुषंगाने असणाऱ्या नियमांचे पालन न करणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिकेची पथके कार्यरत आहेत. नुकतेच आर.एम.सी. प्लांटबाबत प्रदूषण मंडळाचे पत्र प्राप्त झाले असून ज्या प्लांटच्या ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली किंवा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, त्यावर कारवाई करण्याची मोहीम हाती घेत आहोत.
>
> **– विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका**

त्यानुसार प्रदूषण मंडळाने महापालिका पर्यावरण विभागास पत्र पाठवून महापालिका परिसरातील एकूण ३० प्लांटची यादी सील करण्यासाठी दिली आहे. त्या अनुषंगाने ज्या आर.एम.सी.प्लांटच्या ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रणासाठी आवश्यक त्या उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, असे प्लांट बंद करण्याची कारवाई महापालिकेकडून केली जाणार आहे.

पिंपरी चिंचवड शहरातील हवेची गुणवत्ता मानकांच्या मर्यादित राहावी, तसेच नागरिकांना वायू प्रदूषणाचा त्रास होऊ नये, याकरिता पिंपरी चिंचवड महापालिकेकडून दक्षता घेण्यात येत आहे. त्याकरिता महापालिकेने ग्रेडेड रिस्पॉन्स ॲक्शन प्लॅनची (ग्रॅप) अंमलबजावणी केलेली आहे. तसेच शहरातील पर्यावरणविषयक समस्या व तक्रारींचे तात्काळ निरसन करण्यासाठी दोन उपद्रव शोध पथकांची नेमणूक केलेली आहे. त्यानुसार शहरातील वायू प्रदूषणास जबाबदार असणाऱ्या दोषींवर कारवाई करण्यात येत आहे. याच अनुषंगाने आता प्रदूषण मंडळाचे पत्र प्राप्त होताच ज्या आर.एम.सी. प्लांटच्या ठिकाणी वायू प्रदूषण नियंत्रण प्रणाली किंवा उपाययोजना करण्यात आलेल्या नाहीत, त्यावर कारवाई करण्यात येणार आहे.

आर.एम.सी. प्लांटच्या परिसरात धूळ प्रदूषण नियंत्रणासाठी 'वॉटर स्प्रिंकलिंग सिस्टम' वापरणे अनिवार्य आहे. मिक्सिंग ऑपरेशन्स बंदिस्त जागेतच करणे बंधनकारक आहे. खडी, वाळू, क्रश सँड यांच्या वाहतुकीदरम्यान वायू प्रदूषण होऊ नये, याकरिता वाहनांना ताडपत्रीने झाकण्यात यावे. कार्यान्वित असलेले आर.एम.सी. प्लांट मर्यादित वायू प्रदूषणाच्या पातळीत असल्याचे व निर्धारित कालावधीतच कार्यान्वित ठेवणे बंधनकारक आहे.आर.एम.सी. प्लांटच्या परिसरातील ध्वनीची पातळी निर्धारित मर्यादेपेक्षा जास्त नसावी. हे नियम मोडणाऱ्या 30 आरएमसी प्लांटवर कारवाई केली जाणार आहे.

# 'रम्बल स्ट्रिप' कात्रज बोगदा ते नवले पुलादरम्यान बसविण्याचा महापालिकेचा निर्णय

## आयटी पार्कमधील रस्ते खड्डेमुक्त करण्याची मोहीम महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने (एमआयडीसी) हाती घेतली आहे.

**पुणे | प्रतिनिधी**

'नवले पूल परिसरात होत असलेल्या अपघातांच्या घटनांना आळा घालण्यासाठी महापालिकेने पावले उचलली आहेत. कात्रज नवीन बोगदा ते नवले पुलादरम्यान वाहनांचा वेग मर्यादित राहावा, यासाठी 'रम्बल स्ट्रिप' बसविण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. या रस्त्यावर दर पाचशे मीटर अंतरावर चांगल्या दर्जाच्या रम्बल स्ट्रिप बसविण्यात येणार आहेत. यामुळे या भागात होणाऱ्या अपघातांना आळा बसेल,' असा विश्वास महापालिका प्रशासनाने व्यक्त केला.

नवले पुलावर झालेल्या अपघातामध्ये आठ जणांचा मृत्यू झाला. या दुर्घटनेनंतर या भागातून ये-जा करणाऱ्या वाहनचालकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. नवले पुलाजवळ झालेल्या अपघाताच्या पार्श्वभूमीवर महापालिका प्रशासन, वाहतूक पोलिस अधिकारी यांची शुक्रवारी महापालिकेत बैठक झाली. या बैठकीला महापालिका आयुक्त नवल किशोर राम, अतिरिक्त पोलिस आयुक्त मनोज पाटील यांच्यासह महापालिकेच्या विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.




### चार सेवा रस्त्यांची कामे आता सहा महिन्यांत

» नवीन कात्रजचा बोगदा ते हिंजवडीदरम्यान असलेल्या पुणे बेंगळुरू रस्त्यावर होणाऱ्या वाहतूक कोंडीतून वाहनचालकांची सुटका करण्यासाठी चार सेवा रस्त्यांची कामे पूर्ण होणे आवश्यक आहे. हे सेवा रस्ते सुरू झाल्यानंतर महामार्गावर होणारी वाहतूक कोंडी कमी होणार आहे. बालेवाडी ते कात्रजदरम्यान सेवा रस्ते तयार होणे आवश्यक आहे. यासाठी काही जागा ताब्यात घ्यावी लागणार आहेत. त्यासाठी संबंधित जागा मालकांना टीडीआर, एफएसआय तसेच रोख मोबदला देण्याबाबत देखील अभ्यास सुरू आहे. चार सेवा रस्त्यांची कामे सहा महिन्यांत पूर्ण करण्याचा प्रयत्न असल्याचे आयुक्त राम यांनी सांगितले.

### अपघात टाळण्यासाठी महापालिकेचे निर्णय

» या रस्त्यावर अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी महापालिकेने तीन टप्प्यांमध्ये उपाययोजना करण्याचा निर्णय घेतला आहे. यामध्ये एलईडी फलक बसविणे, वेगाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करणे, तसेच वाहनांचा वेग सध्या 60 किलोमीटर प्रति तासवरून 40 किलोमीटर प्रति तासपर्यंत आणणे यांचा समावेश आहे. त्याचबरोबर, या रस्त्यावर वेग मोजण्यासाठी यंत्रणा आणि कॅमेरे बसविण्याचे नियोजनही करण्यात आले आहे. तसेच, बेकायदा पद्धतीने वाहने रस्त्यावर उभी करणाऱ्यांवरही कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आला.

नवले पुलाजवळ असलेल्या तीव्र उतारामुळे अवजड वाहनांचे वेगावर नियंत्रण राहत नाही. त्यामुळे बहुतांश अपघात होत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे या रस्त्यावर पाचशे मीटर अंतरावर वाहनांचा वेग नियंत्रित ठेवण्यासाठी रम्बल स्ट्रिप बसविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, असे महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना सांगितले

आयुक्त राम म्हणाले, 'या रस्त्यावरील अपघातांचे प्रमाण कमी करण्यासाठी तीन टप्प्यांत उपाययोजना केल्या जाणार आहेत. यामध्ये एलईडी फलक बसविणे, वेगाचे उल्लंघन करणाऱ्या वाहनांवर पोलिसांकडून दंडात्मक कारवाई करणे, वाहनांचा वेग ६० किलोमीटरवरून ४० किलोमीटरवर आणणे. वेग मोजण्याची यंत्रणा, कॅमेरे या रस्त्यांवर बसविण्याचे नियोजन करणे. तसेच, बेकायदा पद्धतीने वाहने रस्त्यांवर उभी करणाऱ्यांवर कारवाई करण्याचा निर्णय बैठकीत घेण्यात आला. त्याबाबत आवश्यक त्या सूचना वाहतूक पोलिसांचे वरिष्ठ अधिकारी त्यांच्या कर्मचाऱ्यांना देणार आहेत.

पुण्यातील नवले पुलावर 13 नोव्हेंबरला ट्रकचे ब्रेक फेल झाल्यामुळे भीषण अपघात झाला, ज्यात 8 जणांचा जागीच मृत्यू झाला. नवले ब्रिज खरंच मृत्यूचा सापळा बनत चालला आहे का? हा प्रश्न नागरिकांच्या समोर उभा आहे. मागील 8 वर्षांत या ठिकाणी तब्बल 210 अपघात नोंदले गेले आहेत. यावर उपाय म्हणून, कात्रज नवीन बोगदा ते नवले पुलादरम्यान वाहनांचा वेग मर्यादित ठेवण्यासाठी महापालिकेने रम्बल स्ट्रिप बसविण्याचा निर्णय घेतला आहे. या रस्त्यावर दर 500 मीटर अंतरावर चांगल्या दर्जाच्या रम्बल स्ट्रिप बसविण्यात येणार आहेत.


# नोंदणी विभागाचा मोठा निर्णय; 'या' कागदपत्रांची नोंदणी करण्यास आता स्पष्ट मनाई

## आता ना हरकत प्रमाणपत्राशिवाय दस्तांची नोंद करू नये : सातबारा अथवा प्रॉपर्टीकार्डची तपासणी असणार बंधनकारक

**पुणे | प्रतिनिधी**

मुंढवा आणि ताथवडे येथील शासकीय जागांची खरेदी-विक्रीचा दस्त नोंदविल्याचे प्रकार उघडकीस आल्यानंतर नोंदणी व मुद्रांक विभागाने अशा प्रकरणांची गंभीरतेने दखल घेतली आहे. त्यानुसार दुय्यम निबंधक यांनी दस्त नोंदविताना काय खबरदारी घ्यावी, याबाबतचे परिपत्रक सह जिल्हा निबंधक यांनी जारी केले आहे. यामध्ये प्रामुख्याने दस्तनोंदणी करताना सातबारा उतारा आणि प्रॉपर्टी कार्डवरील शेरे वाचूनच अधिनियमांचे उल्लंघन होणार नाही, याची दक्षता घ्यावी.

तसेच, जर सातबारा उतारा आणि प्रॉपर्टी कार्डवर काही प्रतिबंधात्मक शेरे असतील तर संबंधित शासकीय संस्थेचे ना हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय दस्ताचे नोंदणी करण्यात येऊ नये, असे स्पष्ट आदेश सह जिल्हा निबंधक संतोष हिंगाणे यांनी सर्व दुय्यम निबंधकांना दिले आहेत.राज्य शासनाच्या राजपत्र २८/०४/२०२५ नुसार, 'नोंदणी (महाराष्ट्र सुधारणा) अधिनियम २०२३' अस्तित्वात आला असून, नोंदणी अधिनियम १९०८ मध्ये महत्त्वाचे बदल करण्यात आले आहेत.




### या दस्तऐवजांची नोंदणी करण्यास स्पष्टपणे मनाई

» कोणत्याही केंद्रीय किंवा राज्य अधिनियमाद्वारे ज्या व्यवहारांना मनाई आहे, अशांशी संबंधित दस्तऐवज.

» केंद्र किंवा राज्य सरकारची किंवा त्यांच्या कोणत्याही प्राधिकरणाची अथवा उपक्रमाची मालकी असलेल्या स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित दस्तऐवज. केवळ सांविधानिकदृष्ट्या अधिकार असलेल्या व्यक्तीने निष्पादित केलेला दस्तऐवज वगळता इतर कोणत्याही व्यक्तीने निष्पादित केलेला दस्तऐवज नोंदणीस नाकारला जाईल.

» सक्षम प्राधिकरणाने, न्यायालयाने किंवा न्यायाधिकरणाने कायमस्वरूपी किंवा तात्पुरत्या स्वरूपात जप्त केलेल्या स्थावर मालमत्तेच्या हस्तांतरणाशी संबंधित दस्तऐवज.

या नवीन तरतुदींमुळे आता काही विशिष्ट दस्तऐवजांची नोंदणी नाकारणे बंधनकारक झाले आहे. दस्तऐवज नोंदणी करताना सातबारा उताऱ्यावर अथवा प्रॉपर्टी कार्डवरील शेरे काळजीपूर्वक वाचावेत आणि नवीन अधिनियमाचा भंग होणार नाही याची खात्री करावी. तसेच जर सातबारा उताऱ्यावर अथवा प्रॉपर्टी कार्डवर कोणतेही खरेदी-विक्रीस बंदीचे प्रतिबंधात्मक स्वरूपाचे शेरे नमूद असतील, तर संबंधित प्राधिकरणाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेतल्याशिवाय दस्तऐवज नोंदणी करू नये

तसेच, दस्तऐवज नोंदणी करताना सातबारा उतारा आणि झोन दाखला अद्ययावत असल्याची खात्री करावी. तसेच, नोंदींमध्ये म्युटेशन स्किप न करता दस्तऐवज नोंदणी केली जावी.

# दौंडमध्ये पुन्हा रंगू लागले पक्ष प्रवेशाचे सोहळे

## केडगाव येथील मयुरेश्वर हॉस्पिटलचे डॉ. भरत खळदकर यांनी आमदार अँड. राहुल कुल यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

**पुणे | प्रतिनिधी**

राज्यातील रखडलेल्या स्थानिक स्वराज्य संस्थाच्या निवडणुकांची तारीख या न्यायालयाच्या निकालानंतर केव्हा ही जाहीर होण्याची शक्यता आहे. त्या मुळे या मिनी विधानसभेच्या तोंडावर दौंड तालुक्यात पुन्हा पक्ष प्रवेशाचे सोहळे तालुक्यात रंगू लागले आहेत. केडगाव येथील मयुरेश्वर हॉस्पिटलचे डॉ. भरत खळदकर यांनी शुक्रवारी (दि.१४) आमदार अँड. राहुल कुल यांच्या उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला.

डॉ. भरत खळदकर हे नुकत्याच झालेल्या विधानसभेला राष्ट्रवादी शरद पवार पक्षाकडून इच्छुक उमेदवार होते.मागील महिन्यात नानगांव येथील राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या माजी पंचायत समिती सदस्या नीता खळदकर यांच्या समवेत कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे. दि. १७ ऑक्टोबर रोजी भाजपचे दौंड शहराचे अध्यक्ष स्वप्निल शहा व नंदू पवार यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत दौंडमध्ये जाहीर पक्ष प्रवेश केला आहे.



### पडद्यामागच्या हालचालींना वेग

» पंचायत समिती निवडणुकीची दौंड तालुक्याची सूत्रे हातात घेतली आहेत.भाजपचे आमदार अँड. राहुल कुल यांनी सुद्धा प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली आहे. प्रतिस्पर्धी संभाव्य उमेदवाराच्या तोडीस तोड उमेदवार उभे करण्याच्या चाचपणी सुरू असून पडद्यामागच्या हालचालींना वेग आला आहे.

नुकत्याच झालेल्या विधान सभेच्या पार्श्वभूमीवर सुद्धा दौंड तालुक्यात अनेक पक्ष प्रवेश झाले होते. त्यातील माजी आमदार रमेश थोरात व भाजपाचे माजी जिल्हाध्यक्ष नामदेव ताकवणे यांचा राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार या पक्षात झालेला पक्ष प्रवेश हा दखलपात्र पक्ष प्रवेश होता. यांच्या या प्रवेशामुळे दौंड तालुक्यात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे पारडे जड झाले होते. त्यामुळे विधान सभेच्या निवडणुकीत चुरस निर्माण झालेली आपणास पाहवयास मिळाली.

परंतु रमेश थोरात यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्षाला ऐन वेळेस सोडचिट्ठी देऊन तीन महिन्यापूर्वी पुन्हा राष्ट्रवादी अजित पवार गटात प्रवेश करून जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीची दौंड तालुक्याची सूत्रे हातात घेतली आहेत. भाजपचे आमदार अँड. राहुल कुल यांनी सुद्धा प्रमुख कार्यकर्त्यांची बैठक घेतली आहे. प्रतिस्पर्धी संभाव्य उमेदवाराच्या तोडीस तोड उमेदवार उभे करण्याच्या चाचपणी सुरू असून पडद्यामागच्या हालचालींना वेग आला आहे.

अप्पासाहेब पवार व प्रमुख पदाधिकारी हे त्यांच्या पक्षाच्या प्रत्येक गावच्या कार्यकर्त्याच्या संपर्कात आहेत. तालुक्यात सर्व ठिकाणी उमेदवार उभे करणार असून आघाडीतील सर्व घटक पक्षांसमवेत या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे अप्पासाहेब पवार यांनी सांगितले. दौंड तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीची शक्यता असून तसे न झाल्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार), राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष व भारतीय जनता पक्ष या मुख्य तीन पक्षात लढत होऊ शकते.

### अजूनही पक्षप्रवेश होणार...

» विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर तालुक्यामध्ये अनेक पक्ष प्रवेश सोहळे पहावयास मिळाले होते. आता मिनी विधानसभा म्हणजेच जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकीच्या तोंडावर ही तालुक्यामध्ये काही दखलपात्र पक्ष प्रवेश सोहळे झाले आहेत व असेच आजून काही प्रवेश सोहळे होणार आहेत. एकनाथ शिंदे यांच्या शिवसेना पक्षात राष्ट्रवादी शरद पवार पक्षाचे एक उच्च पदस्थ पदाधिकारी पक्ष प्रवेश करणार असल्याची कुजबुज ऐकवयास मिळत आहे.

### दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीची शक्यता

» तालुक्यात सर्व ठिकाणी उमेदवार उभे करणार असून आघाडीतील सर्व घटक पक्षांसमवेत या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याचे अप्पासाहेब पवार यांनी सांगितले. दौंड तालुक्यात दोन्ही राष्ट्रवादीच्या युतीची शक्यता असून तसे न झाल्यास राष्ट्रवादी कॉंग्रेस (अजित पवार), राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार पक्ष व भारतीय जनता पक्ष या मुख्य तीन पक्षात लढत होऊ शकते.

# शिरूरची सत्ता जिंकण्यासाठी मविआ एकवटली! 24 जागांसाठी इच्छुकांच्या मुलाखती

## महाविकास आघाडीचे शिरूर-हवेलीचे माजी आमदार अशोक पवार यांच्या पक्ष कार्यालयात या मुलाखती पार पडल्या.

**पुणे | प्रतिनिधी**

शिरूर नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीत उमेदवारांची पसंती मोठ्या प्रमाणावर महाविकास आघाडीकडे झुकत असून, आघाडी एकजुटीने या निवडणुकीला सामोरे जाणार असल्याची माहिती खासदार डॉ. अमोल कोल्हे यांनी दिली. नगरपरिषदेमधील 24 जागांसाठी इच्छुक उमेदवारांच्या मुलाखतींसाठी आघाडीने सुरू केलेल्या प्रक्रियेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. महाविकास आघाडीचे शिरूर-हवेलीचे माजी आमदार अशोक पवार यांच्या पक्ष कार्यालयात या मुलाखती पार पडल्या.




नगराध्यक्ष व बारा प्रभागांसाठी उमेदवार निवड प्रक्रियेत आघाडीने स्थानिक कार्यकर्त्यांच्या जनाधारास प्राधान्य देण्याच्या भूमिकेची पुनरुज्जीवित केले. मुलाखत प्रक्रियेस राष्ट्रवादी कॉंग्रेसचे जिल्हाध्यक्ष देवदत्त निकम, विश्वासकाका ढमढेरे, पांडुरंग अण्णा थोरात, शिवसेना तालुका प्रमुख पोपट शेलार, माजी नगराध्यक्ष रविंद्र ढोबळे, संजय देशमुख, मंगेश खांडरे, मुन्ना शेख, माजी कॉंग्रेस तालुकाध्यक्ष वैभव यादव, अँड. किरण आंबेकर, अँड. प्रदीप बारवकर, अजिम सय्यद, राष्ट्रवादीचे मुजफ्फर कुरेशी, राहील शेख , हाफिज बागवान आदी पदाधिकारी उपस्थित होते.

तसेच मोठ्या संख्येने महिला व पुरुष इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहून मुलाखती दिल्या. खासदार डॉ. कोल्हे म्हणाले, शिरूरवासीयांचा कल आघाडीकडे असल्याचे प्रत्यय मुलाखत प्रक्रियेत मिळत आहे. पारदर्शक निकषांवर आधारित उपयुक्त उमेदवारांची निवड होणार असून शिरूरच्या विकासाला ही निवडणूक नवी दिशा देईल.

माजी आमदार अशोक पवार यांनीही कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता आघाडी मजबूत असल्याचे सांगितले. शहराच्या मूलभूत सुविधांचा विकास आणि नागरिकाभिमुख निर्णय हेच आमचे प्राधान्य, असे ते म्हणाले. महाविकास आघाडीच्या छाननी समितीने उमेदवारांच्या मुलाखतींचा पहिला टप्पा पूर्ण केला असून पहिली उमेदवारांची अधिकृत यादी लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.

### उमेदवारांची अधिकृत यादी लवकरच जाहीर

» माजी आमदार अशोक पवार यांनीही कार्यकर्त्यांचा उत्साह पाहता आघाडी मजबूत असल्याचे सांगितले. शहराच्या मूलभूत सुविधांचा विकास आणि नागरिकाभिमुख निर्णय हेच आमचे प्राधान्य, असे ते म्हणाले. महाविकास आघाडीच्या छाननी समितीने उमेदवारांच्या मुलाखतींचा पहिला टप्पा पूर्ण केला असून पहिली उमेदवारांची अधिकृत यादी लवकरच जाहीर होण्याची शक्यता आहे.